# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक ०४.१०.२०२५ शनिवार**

**मा. न्यायालयातुन आरोपीला २० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा :—**

दिनांक ०१.१०.२०२५ रोजी मा. अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश, विशेष न्यायाधिश पोक्सो, नागपुर, श्री. एस.ए. श्रीखंडे साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. २७०/२०२२ मधील, पोलीस ठाणे कळमणा येथील अप. क्र. १९१/२०२२ कलम ३७६(३), ३७६(एल), ३२३, २०१ भा.द.वि., सहकलम ४, ५, ६ पोक्सो या गुन्ह्यातील आरोपी प्रभूप्रसाद मय्यूद्दीन शाहू, वय १९ वर्षे, रा. जुना कामठी रोड, कळमणा, नागपूर यांचे विरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम २३५(२) सि.आर.पी.सी नुसार, कलम पोक्सो अन्वये २० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व ४,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०६ महिने अतिरीक्त सश्रम कारावासाची शिक्षा तसेच, कलम १२ पोक्सो अन्वये ०१ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व ५००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०१ महिना अतिरीक्त सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली. तसेच, कलम ३२३ भा.दं.वि. मध्ये निर्दोष मुक्त करण्यात आले.**

दिनांक ०७.०४.२०२२ चे १९.०० वा. ते २३.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कळमणा हद्दीत राहणाऱ्या ३५ वर्षीय फिर्यादी यांची १४ वर्षीय अल्पवयीन मुलगी/पिडीता हिला वर नमुद आरोपीने फुस लावून पोलीस ठाणे कळमणा हद्दीत, एका हॉटेलचे टेरीसवर नेवून, पिडीताचे ईच्छेविरूध्द तिचेसोबत जबरी संभोग केला. तसेच, कोणाला काहीही सांगीतल्यास पाहुन घेण्याची धमकी देवुन, पिडीतेला हातबुक्कीने मारहाण केली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमणा येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीस दिनांक ०९.०४.२०२१ रोजी १६.४० वा. अटक करण्यात आली होती.

गुन्हयाचे तपासी अधिकारी तत्कालीन मसपोनि. श्रीमती चंदा दंडवते यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती रश्मी खापर्डे मॅडम यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. आर.पी ढाले यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी पोहवा. प्रमोद राठोड, मपोहवा. हर्षादा चौधरी व पोअं. कुलदीप कांबळे यांनी काम पाहिले.

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, ड्रंकन ड्राईव्ह कायद्या अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०३.१०.२०२५ रोजी नागपूर शहर पोलीसांनी, सर्व पोलीस ठाणे हद्दीत **महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ०६ केसेसमध्ये ०६ ईसमावर कारवाई करून रू. १३,३१०/— चा** मुद्देमाल जप्त केला. **महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये ०५ केसेसमध्ये ०८ ईसमावर कारवाई करून रू. १,०५,२६५/— चा** मुद्देमाल जप्त केला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकुण ६८८ वाहन चालकांवर कारवाई करून एकूण रू. २,१३,६५०/— रू. तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ०१ पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०१.१०.२०२५ चे १९.३० वा. चे सुमारास, फिर्यादी राजेश लखलाल गौतम, वय ३९ वर्ष, रा. प्लॉट नं. १००, नेहरू नगर, हुडकेश्वर, नागपूर यांनी त्यांची होन्डा अॅक्टीव्हा गाडी क्र. एम.एच. ४९ डि. ०८३९ किंमती ८०,०००/—रू. ची ही पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत, बेसा पावर हाऊस जवळ, रिंग रोडचे बाजुला ऊभी करून, गाडीची चाबी न काढता, बाजुचे पानठेल्यावर त्यांचे मित्राला भेटण्यास गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हेशाखा युनिट क्र. ०१ चे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांना एका होन्डा अॅक्टीव्हा गाडीवर एक ईसम संशयितरित्या जातांना दिसुन आल्याने, त्याचा पाठलाग करून व थांबवून त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव कुणाल मंगल उके, वय ३२ वर्ष, रा. नविन सुभेदार ले—आऊट, हुडकेश्वर, नागपूर असे सांगीतले. त्यास गाडीचे कागदपत्रे मागीतले असता, त्याने समाधानकारक उत्तरे न दिल्याने, दुचाकी बाबत खात्री केली असता, नमुद दुचाकी वाहन चोरीची असल्याचे समजले. आरोपीस अधिक सखोल विचारपूस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन होन्डा अॅक्टीव्हा गाडी क्र. एम.एच. ४९ डि.टी. ०८३९ किंमती अंदाजे ८०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी हुडकेश्वर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि. सचिन भोंडे, पोहवा. मनोज टेकाम, सुशांत सोळंके, प्रितम यादव, शरद चांभारे, पोअ. स्वप्नील खोडके, योगेश वासनीक व अजमत शेख यांनी केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे हिंगणा :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०४.१०.२०२५ चे ००.४० वा. चे सुमारास, हिंगणा पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, समृध्दी महामार्ग वरील वायफळ टोल नाका जवळ एका टाटा एस योध्दा ट्रक क्र. एम.एच. ४० जि.सी. ०२०३ ला , त्याची पंचासमक्ष पाहणी केली असता, त्यामध्ये एकुण १२ लहान—मोठे जिवंत गोवंशीय जनावरांना अवैधरित्या, निदर्यतेने, चारा—पाणी न देता बांधुन कत्तलीकरीता वाहतुक करतांना दिसुन आले. वाहन चालकास त्याचे नाव विचारले असता, त्याने आपले नाव सुफीयान खान शरीफ खान, वय १९ वर्ष, व क्लीनर नामे शेख नसीम शेख हसन, वय २२ वर्ष, दोन्ही रा. सुफी नगर, वलगाव, अमरावती, जि. अमरावती असे सांगीतले. नमुद जनावरांबाबत कागदपत्रे मागीतली असता, कोणीतीही कागदपत्रे न देता उडवा—उडवीचे

उत्तरे दिली. आरोपी हे नमुद जनावरे यांना कत्तलीकरीता निर्दयतेने वाहतुक करीत असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींचे ताब्यातुन एकुण १२ लहान—मोठे जिवंत गोवंशीय जनावरे व टाटा योध्दा ट्रक वाहन असा एकुण किंमती अंदाजे ११,२८,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नमुद जनावरे यांना गोरक्षण येथे दाखल करण्यात आले आहे.

याप्रकरणी फिर्यादी पोअं. संजीव तायडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे सपोनि. नाडे ९९७५२४९४७३ यांनी आरोपीविरूध्द कलम ५, ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनीयम १९७६, सहकलम ११(१)(डी), ११(१)(ई), ११(१)(एफ) प्राणी क्रुरता अधिनियम—१९६० अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे जरीपटका :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०२.१०.२०२५ चे ११.०० वा. ते दिनांक ०३.१०.२०२५ चे ०९.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे जरीपटका, हद्दीत प्लॉट नं. १९, आदर्श कॉलोनी, दयालू सोसायटी, नारा रोड, जरीपटका, नागपुर येथे राहणाऱ्या फिर्यादी कु. रोहीनी रमेश यादव, वय २७ वर्षे ह्या आपले घराला कुलुप लावुन परिवारासह त्यांचे मोठे वडीलांचे घरी भिमचौक येथे गृहप्रवेशाचे कार्यक्रमाकरीता गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मागील दाराचे कुलूप व कडीकोंडा तोडुन, घरात प्रवेश करून, बेडरूम मधील लोखंडी कपाटातील रोख ८,६०,०००/—रू., सोन्याचे दागिने वजनी १७२ ग्रॅम व चांदीचे दागिने वजनी १,५८० ग्रॅम असा एकुण १८,७६,२००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

यांप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे मपोउपनि. बाबर ९०९६६७६९३६ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे अजनी :—** दिनांक २९.०९.२०२५ चे १६.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे अजनी हद्दीत मेडीकल चौक, नाथे बुक डेपो जवळ अर्जुन ठाकरे नावाचे निराधार ईसम वय अंदाजे ४५ वर्ष, रंग—सावळा, चेहरा—गोल, ऊंची— ५ फुट ६ इंच, केस—काळे, दाढी मिशी काळी, अंगात— आकाशी रंगाचा उपरन व काळ्यां रंगाचा हाफ बरमूडा घातलेले तसेच, डावीकडून छातीवर माँ, आई, जय माँ, सरस्वती माँ असे गोंदन/उजव्या हाताचे दंडावर त्रिशूल, ओम असे गोंदन/उजव्या हातावर गोंदन अस्पष्ट अशा वर्णनाचे बेशुध्द अवस्थेत मिळुन आले. त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे दाखल केले असता, उपचारादरम्यान दि. ०३.१०.२०२५ चे १०.४५ वा. चे सुमारास डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

यांप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे अजनी येथे पोउपनि. घागरे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे बेलतरोडी :—** दिनांक ०३.१०.२०२५ चे १७.२० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत शंकरपूर, आनंदम फार्म हाऊस समोरील ओ.सी.डब्ल्यू पाण्याचे टाकी जवळ एक अनोळखी ईसम वय अंदाजे ३० ते ३५ वर्ष वयाचे बांधा—मजबुत, अंगात—काळ्या रंगाची अंडरविअर व सॅण्डो बनियान घातलेले वर्णनाचे ईसम बेशुध्द अवस्थेत मिळुन आले. त्यांना उपचाराकरीता एम्स हॉस्पीटल, मिहान येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

यांप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे मपोउपनि. चौधरी यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

स्वा/–

(अंकुश उ. राठोड)

पोलीस उप–निरीक्षक,

पोलीस जनसंपर्क अधिकारी,

नागपुर शहर.